# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते

क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी

क्रमांक – काआअ/१४०६/क्षरुस (काआ) दिनांक –१६.०५.२०२५

**संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाचा स्वारस्य अभिव्यक्ती सूचना.**

विषय :- क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी येथे आंतररुग्णांची रुग्णसेवा, दैनंदिन रुग्णसहाय्य/ रुग्णसेवा व इतर रुग्णालयीन कामासाठी एका वेळी सहा महिन्यांकरिता कंत्राटी तत्वावर ५० बहुउद्देशिय कामगार पुरविण्याकरीता मुख्य पर्यवेक्षक (AHS) एफ दक्षिण विभागाच्या सेवाभावी नोंदणीकृत संस्थेची (NGO) नेमणूक करण्याबाबत विहित कालावधित अर्ज न आल्याने मुदत दि.२१.०५.२०२५ पर्यंत वाढविण्याबाबत.

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी रुग्णालयाच्या आंतररुग्णांची रुग्णसेवा, दैनंदिन रूग्णसहाय्य/ रुग्णसेवा व इतर रुग्णालयीन या कामासाठी कंत्राटी तत्वावर ५० बहुउद्देशीय कामगार पुरविण्यासाठी १७९ दिवसांकरिता इच्छूक मुख्य पर्यवेक्षक (AHS) एफ दक्षिण विभागाच्या सेवाभावी नोंदणीकृत संस्थेकडून (NGO) मोहरबंद इच्छापत्र मागवित आहोत.विहित कालावधित अर्ज न आल्याने दि.२१.०५.२०२५ दूपारी १.०० वाजेपर्यंत मुदत वाढविण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | बहुउद्देशिय कामगारांची संख्या | ५० |
| २ | कामाचे स्वरूप व तपशील | **कामाचे स्वरुपः-**<br>स्वयंसेवी संस्था यांनी कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाच्या दिनांकापासून आंतररुग्णांची रुग्णसेवा, दैनंदिन रुग्णसहाय्य/रुग्णसेवा व इतर रुग्णालयीन कामे पार पाडण्याकरिता दररोज तीन पाळीत (रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार) ५० बहुउद्देशीय कामगार) नियुक्त करणे आवश्यक आहे.<br>**कामाचे तपशीलः-**<br>१. आंतररुग्णांची रुग्णसेवा, दैनंदिन रुग्णसहाय्य /रुग्णसेवा व इतर रुग्णालयीन कामे<br>२. कार्यालयीन आवक/जावक<br>३. रुग्णांच्या चहा,दूध,जेवण व इतर खाद्य पदार्थाचे वाटप.<br>४. रुग्णांचे बिछाने, लॉकर्स व रुग्णांची साफसफाई.<br>५. वरिष्ठांनी सांगितलेली इतर कामे.<br>६. रुग्णांना वैद्यकीय चाचणीसाठी घेऊन जाणे, शस्त्रकियेकरीता घेऊन जाणे व परत आणणे.<br>७. अवलंबीत रुग्णांना प्रसाधन गृहात घेऊन जाणे.<br>८. महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवेशी सहाय्यकारी व इतर संबधीत कामे करणे, रुग्णालय, प्रयोगशाळा इतर संबधित वास्तुंची स्वच्छता ठेवणे. महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे.<br>९. प्रत्येक पाळीमध्ये खालील कामे करावी लागतील रुग्णालयातील कस वरांडा, बाथरुम, जिने स्वच्छतागृह , भितीवरची जाळी साफ करणे पंखे पुसणे इत्यादी कामे करणे.<br>१०. रुग्णांनी अंथरुणावर संडास, लघवी केली असल्यास बेडशिट चेज करणे |

| | | |
|---|---|---|
| | | धुलाई करणे तसेच रुग्णांना आंघोळ घालणे.<br>११. रुग्णाची चाटी धुणे.<br>१२. औषध विभागातुन औषधे आणणे, वस्तु भांडार मधुन स्टेशनरी कपडे आणणे ,लिलन विभागातुन कपडे आणणे.<br>१३.बहुउद्देशिय कर्मचा-याकडे जर कुशल कारागीर चे प्रमाणपत्र असल्यास उदा. सुतार,तारतंत्री, उदवाहनचालक.नाभिक इत्यादी तर ती काम करणे. |
| ३ | कामाच्या अटी/शर्ती | १.निवड झालेल्या स्वयंसेवी संस्थेस प्रतिदिन प्रती बहुउद्देशीय कामगारांचे वेतन रु. ७७३.४६/- या दराने + लेव्ही ४९.५८% (वेतनाबाबत प्रमुख कामगार अधिकारी यांच्यामार्फत वेळोवेळी प्रसारित होणा-या परिपत्रकानुसार अदा करण्यात येईल.) चे अधिदान करण्यात येईल.<br>प्रचलित नियमानुसार आयकर व इतर खर्च/ दंड मासिक वजावट करण्यात येईल.<br>२.सदर संस्थेने त्यांच्याकडील कार्यरत बहुउद्देशिय कामगारांना मासिक अनुदानाचे अधिदान त्यांच्या बँक खात्यामध्ये **ECS/NEFT/RTGS** प्रणालीतून करणे बंधनकारक आहे.<br>३.सदर संस्था बहुउद्देशीय कामगारांना प्रतिदिन देण्यात येणारी रक्कम किमान वेतन कायद्यानुसार आहे याबाबत दक्षता घेईल.<br>४.प्रस्तावित कामाच्या ठिकाणी बाल कामगार कार्यरत असणार नाही याबाबत संबंधित संस्था योग्य ती दक्षता घेईल.<br>५.संस्थेने पुरविण्यात येणा-या बहुउद्देशिय कामगारांना ओळखपत्र व गणवेश देणे बंधनकारक राहिल.<br>६.रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काम चालू ठेवणे संस्थेस बंधनकारक असेल.<br>७.बहुउद्देशीय कामगारांची उपस्थिती नोंदविण्याकरिता उपस्थितीपत्रक ठेवणे बंधनकारक असेल.<br>८.बहुउद्देशीय कामगार १०० गुणांचा मराठी विषय घेऊन माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>९.वयोमर्यादा:- बहुउद्देशीय कामगाराचे वय वर्षे १८ ते ३८ पर्यंत असावे.<br>१०.बहुउद्देशीय कामगारांने कामाच्या ठिकाणी कर्तव्य कालावधीमध्ये ओळखपत्र लावणे आवश्यक राहील.<br>११.निवड झालेल्या संस्थेने काम सुरु करण्यापुर्वी २ दिवस अगोदर बहुउद्देशिय कामगारांची यादी सोबत बहुउद्देशिय कामगारांचे १०० गुणांचा मराठी विषय घेऊन माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक /प्रमाणपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड, तसेच वयोमर्यादा इ. कागदपत्रांची संस्थेने पडताळणी करून या कार्यालयास बहुउद्देशिय कामगारांची यादी सादर करावी, सदर माहिती खोटी किंवा चुकीची आढळून आल्यास संस्थेला देण्यास आलेले कंत्राट त्वरित रद्द करण्यात येईल. |
| ४ | संस्थेकडून बहुउद्देशिय कामगारांसाठी पुरविण्यात येणारे आवश्यक साहीत्य. | गणवेश, हातमोजे, फेसमास्क, साबण, तसेच भौगोलिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेले इतर साहित्य पुरविणे आवश्यक राहील. ओळखपत्र - कामाच्या ठिकाणी कर्तव्य कालावधीमध्ये ओळखपत्र लावणे आवश्यक राहील. |
| ५ | या कामासाठी कोणती संस्था | १) मुख्य पर्यवेक्षक (**AHS**) एफ दक्षिण विभागाच्या नोंद असलेली |

| | | |
|---|---|---|
| | अर्ज करू शकते. | सेवाभावी नोंदणीकृत संस्था (NGO).<br>२) सन २०२३-२०२४ असल्यास किंवा लगतच्या वर्षाचा ताळेबंद सादर करणे बंधनकारक राहील.<br>३) संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) १९७० अन्वये परवानाधारक.<br>४) कामगार भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९४२ अतंर्गत नोंदणी परवानाधारक.<br>५) कामगार राज्य विमा योजना १९४८ अतंर्गत नोंदणी परवानाधारक.<br>६) महाराष्ट्र शासन व केंद्र शासनांचे सर्व कामगार कायदे पाळणे बंधनकारक आहे.<br>७) महानगरपालिका रूग्णालयामध्ये रुग्णालयीन कामाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.<br>८) GST नोंदणी क्रमांक असणे बंधनकारक आहे.<br>९) संस्थेच्या नावाने पॅन कार्ड असणे बंधनकारक आहे.<br>१०) ज्या संस्थां काळया यादीत आहे किंवा ज्या संस्थेचे काम बृहन्मुंबई महागरपालिकेला समाधानकारक वाटले नाही म्हणून काढून टाकले आहे. त्या संस्थानी या कामासाठी अर्ज करू नये. कारण अशा संस्थाना आपोआप अपात्र ठरविण्यात येईल . |
| ६ | अर्ज विक्री कालावधी | दि.१९.०५.२०२५ पासून दि.२०.०५.२०२५ सकाळी ११ वा. ते दुपारी २.०० वा. पर्यंत |
| ७ | अर्ज (इच्छापत्र) स्विकारण्याचा दिनांक व वेळ | दि.२१.०५.२०२५ दूपारी १.०० वाजेपर्यंत विहित तारखेनंतर व वेळेनंतर आलेले अर्ज (इच्छापत्र) विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कुठलाही पत्रव्यव्हार स्विकारला जाणार नाही.<br>(अर्ज (इच्छापत्र) मोहरबंद लिफाफामध्ये असणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज (इच्छापत्र) स्विकारले जाणार नाहीत.) |
| ८ | अर्ज (इच्छापत्र) कारण्याचे ठिकाण. | पत्ता: **वैद्यकीय अधिक्षक, क्षयरोग रुग्णालय समूह ,**जेरबाई वाडीया रोड, शिवडी ,मुंबई ४०० ०१५. |
| ९ | अर्जाचे छाणनी शुल्क/टेंडर शुल्क | रु. ३,३०० + १८% जीएसटी= ३,८९४/-<br>(सदर रक्कमेचे चलन रुग्णालयाच्या कार्यालयामधून कार्यालयीन वेळेत चलन प्राप्त करुन बृहन्मुंबई महागरपालिकेच्या जवळच्या नागरी सुविधा केंद्रात भरणा करावा. सदर रक्कमेची भरणा पावती सादर केल्यानंतर आपणास अर्ज घेण्यात येईल.) |
| १० | अर्जा (इच्छापत्रा) सोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे | १. सेवाभावी संस्था मुख्य पर्यवेक्षक (AHS) एफ दक्षिण विभागात नोंद असलेले कागदपत्रे.<br>२. संस्थेची घटना व उपविधी.<br>३. सन २०२३-२०२४ असल्यास किंवा लगतच्या वर्षाचा ताळेबंद.<br>४. संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवाना.<br>५. कामगार भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९४२ अतंर्गत नोंदणी परवाना. |

| | | |
|---|---|---|
| | | ६. कामगार राज्य विमा योजना १९४८ अतंर्गत नोंदणी परवाना.<br>७. महानगरपालिका रूग्णालयामध्ये रुग्णसहाय्य/रुग्णसेवा अनुभवाची कागदपत्रे<br>८. संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे संपूर्ण नाव, पद मोबाईल नंबर यांची सुची.<br>९. संस्थेचे पॅन कार्ड.<br>१०. GST नोंदणी क्रमांक.<br>११. वास्तव्याचा पुरावा लेटरहेडवर.<br>१२.संस्थेने रू.५००/- च्या स्टॅप पेपरवर हमी पत्र सोबत दिलेल्या परिशिष्ट-क नमुन्यात सादर करावा.<br>१३. कागद पत्रांसोबत संस्थेच्या किमान तीन पदाधिकाऱ्यांचे ज्यात अध्यक्ष , सचिव व अन्य एक पदाधिकारी यांचे स्वत:च्या स्वाक्षरी सहीत फोटो देणे आवश्यक आहे.<br>वरील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे. व संस्थेने अध्यक्ष व सचिव अथवा ज्यांना संस्थेशी संबंधित कागदपत्रावर स्वाक्षरी करण्यासाठी प्राधिकृत केले असेल त्यांनी अर्जाच्या व हमी पत्राच्या प्रत्येक पानावर संस्थेची मोहर व स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. |
| ११ | निवड प्रक्रिया | पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार अर्जाची छाननी केली जाईल. एक संस्था एकच अर्ज सादर करू शकते. अर्ज करणाऱ्या संस्थेचे पदाधिकारी अन्य संस्थेच्या कार्यकारणी पदावर आढळल्यास एकच संस्था पात्र ठरेल. सर्व पात्र संस्थांमधून सोडत पध्दतीने संस्थाची नेमणूक करण्यात येईल.<br>अ.क्र.२ कामाचे स्वरूप व तपशील यामध्ये नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटी तत्वावर ५० बहुउद्देशिय कामगार पुरविण्याबाबत सर्व पात्र संस्थांची कार्यालयाच्या सुचना फलकावर सुची जाहिर केली जाईल.<br>जर एखाद्या संस्थेने त्यांना दिलेले काम करण्यास नकार दिल्यास/ असमर्थ ठरली तर उर्वरित पात्र सुचीतील संस्थांमधून सोडत काढण्यात येईल. अर्जदार नेमुन दिलेल्या कामाची आपापसात अदलाबदल करू शकत नाही. |
| १२ | संस्थांनी करावयाची कार्यवाही | संस्थेने काम पुर्ण झाल्यानंतर देयक आवश्यक कागदपत्रांसह ०७ दिवसांच्या आत कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. |
| १३ | निविदेबाबतचे अधिकार | निवेदेतील कोणतीही अट शिथिल करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अथवा कोणतेही कारण न देता इच्छापत्रासाठी केलेली मागणी रद्द करण्याचे तसेच निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना असतील. |
| १४ | कामाचे पुनर्वाटप | संस्थेला मिळालेले काम दुसऱ्या संस्थेला कामाचे पुनर्वाटप करून देता येणार नाही.<br>दिलेले काम त्याच संस्थेने करणे बंधनकारक राहील.<br>जर एखादी संस्था दिलेले काम करण्यास असमर्थ ठरली तर दूसऱ्या संस्थेची नेमणूक पात्र सुचीतील संस्थामधून कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या मंजुरीने करण्यात येईल. |
| १५ | अनामत रक्कम व शपथपत्र | निवड करण्यात आलेल्या संस्थेस करार रक्कमेच्या २ टक्के इतकी अनामत रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | (महानगरपालिकेत सध्या कार्यरत असलेल्या कामासाठी अनामत रक्कम भरली असेल तर ती अनामत रक्कम ह्या कामासाठी ग्राह्य धरली जाणार नाही.)<br>सदर संस्थेने महानगरपालिकेकडून देण्यात येणारे सहाय्य अनुदान तसेच योजनेच्या अटी/शर्ती मान्य असल्याचे शपथपत्र रु.५००/- किंमतीच्या स्टँप पेपरवर देणे आवश्यक आहे. |
| १६ | विधी व लेखनसाहित्य आकार रक्कम | महानगरपालिकेच्या नियमानुसार निवड झालेल्या संस्थेस जमा करावी लागेल. |
| १७ | दंड | परिशिष्ट 'ब'प्रमाणे |
| १८ | प्रतिस्पर्धीबाबत तक्रार | एखाद्या संस्थेला आपल्या प्रतिस्पर्धी संस्थेबाबत अधिकृत कागदपत्रे/माहिती किंवा प्रतिस्पर्धी संस्थेने सादर केलेल्या कागदपत्राबाबत तक्रार असल्यास त्यांच्या पउताळणीकरिता रू.२५,००००/- परतावा रक्कम भरावी लागेल. जर प्रतिस्पर्धी संस्थेने केलेल्या तक्रारीनुसार तक्रार असत्य व अयोग्य असल्यास सदर तक्रारदार संस्थेची सदरची जमा रक्क्म जप्त केली जाईल आणि जर ती सत्य व योग्य असेल तर ज्या संस्थेबाबत तक्रार असेल त्या संस्थेची अनामत रक्कम जप्त करून बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे कायदेशीररित्या ५ वर्षाकरिता काळया यादीत टाकले जाईल व तक्रारदर संस्थेची रक्कम परते केली जाईल. |

**सही/-**
**वैद्यकीय अधिक्षक**
**क्षयरोग रुग्णालय समूह**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

दि....../......./२०२५

प्रति,

**वैद्यकीय अधिक्षक**

**क्षयरोग रुग्णालय समूह ,**

जेरबाई वाडीया रोड, शिवडी ,

मुंबई ४०० ०१५.

इच्छापत्र

(अर्जाचा नमूना)

विषयः- आंतररुग्णांची रूग्णसेवा, दैनंदिन रूग्णसहाय्य/रुग्णसेवा व इतर रुग्णालयीन कामासाठी कंत्राटी तत्वावर ५० बहुउद्देशिय कामगार पुरविणेबाबत.

संदर्भः- जाहिरात क्र. ........................ दि. .... ./......./२०२५

अर्जाचा तपशील:-

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | मेसर्स........................................................ |
| २ | संस्था महानगरपालिका नोंदणी क्रमांक | ................................................................ |
| ३ | बीएमसी वेंडर क्रमांक | ................................................................ |
| ४ | पत्रव्यवहारासाठी संस्थेचा संपूर्ण पत्ता | कार्यालय:-...................................................<br>...............................................................<br>पिनकोड क्र...................................................<br>दुरध्वनी :-...................................................<br>भ्रमरध्वनी:-..................................................<br>फॅक्स:-........................................................<br>ईमेल आयडी:-............................................... |
| ५ | संस्थेचा पॅन क्रमांक | ................................................................ |
| ६ | संस्थेचा जीएसटी क्रमांक | ................................................................ |
| ७ | कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवाना क्रमांक | ................................................................ |
| ८ | कामगार भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९४२ अतंर्गत नोंदणी परवाना क्रमांक. | ................................................................ |
| ९ | कामगार राज्य विमा योजना १९४८ अतंर्गत नोंदणी परवाना क्रमांक. | ................................................................ |
| १० | रुग्णालयीन कामाचा अनुभव असल्यास, | होय /नाही.<br>रुग्णालयाचे नाव ............................................<br>................................................................<br>................................................................ |
| ११ | संस्थेस महानगरपालिकेने काळ्या यादीत | होय /नाही. |

| | | |
|---|---|---|
| | टाकले आहे का ? | |

मी खालील कागदपत्रांच्या स्थळप्रती साक्षांकीत करुन अर्जासोबत सोबत जोडत आहेत.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | जोडले आहे/नाही |
|---|---|---|
| १ | संस्था महानगरपालिकेकडे नोंद असलेले कागदपत्रे. | आहे/नाही |
| २ | संस्थेची घटना व उपविधी. | आहे/नाही |
| ३ | सन २०२३-२०२४ असल्यास किंवा लगतच्या वर्षाचा ताळेबंद. | आहे/नाही |
| ४ | संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवाना. | आहे/नाही |
| ५ | संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवाना. | आहे/नाही |
| ६ | कामगार भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९४२ अतंर्गत नोंदणी परवाना. | आहे/नाही |
| ७ | कामगार राज्य विमा योजना १९४८ अतंर्गत नोंदणी परवाना. | आहे/नाही |
| ८ | महानगरपालिका रूग्णालयामध्ये रुग्णसहाय्य / रुग्णसेवा अनुभवाची कागदपत्रे | आहे/नाही |
| ९ | संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे संपूर्ण नाव, पद मोबाईल नंबर यांची सुची. | आहे/नाही |
| १० | संस्थेचे पॅन कार्ड. | आहे/नाही |
| ११ | GST नोंदणी क्रमांक . | आहे/नाही |
| १२ | वास्तव्याचा पुरावा लेटरहेडवर | आहे/नाही |
| १३ | रू. ५०० च्या स्टॅप पेपरवर हमी पत्र सोबत दिलेल्या परिशिष्ट-क नमुन्यात. | आहे/नाही |
| १४ | कागद पत्रांसोबत संस्थेच्या किमान तीन पदाधिकाऱ्यांचे ज्यात अध्यक्ष, सचिव व अन्य एक पदाधिकारी यांचे स्वत:च्या स्वाक्षरी सहीत फोटो देणे आवश्यक आहे. | आहे/नाही |

मी असे घोषित करतो / करते की जाहिरातीतील अटी/शर्ती वाचल्या असून अर्जामध्ये नमूद केलेली माहिती व सोबत जोडलेली कागदपत्रे खरी असून, सदर माहिती व कागदपत्रे खोटी आढळून आल्यास माझी संस्था सदर कामासाठी अपात्र ठरेल.

अर्जदार
संस्था अध्यक्ष /सचिव
सही /रबरी शिक्का

## परिशिष्ट 'ब'

दंड आकारणी (क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी रुग्णालयाच्या आंतररुग्णांची रुग्णसेवा, दैनंदिन रुग्णसहाय्य/रुग्णसेवा व इतर रुग्णालयीन कामाकरिता कंत्राटी तत्वावर ५० बहुउद्देशीय कामगार) संस्थाच्या कामकाजाबाबत चूक निदर्शनास आल्यास अथवा अटी व शर्ती भंग केल्यास आकारण्यात येणाऱ्या दंडात्मक वसूलीचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | दोष व त्रुटी | दंड (रूपयामध्ये) |
|---|---|---|
| १. | अनुपस्थिती | |
| | स्वयंसेवक कमी पुरवल्यास किंवा कामाच्या ठिकाणी हजर नसल्यास | प्रत्येकी ५००/- प्रतिदिन |
| २. | १) रुग्ण कक्षात रुग्णांना योग्य सेवा न दिल्यास, सकाळ, दुपार, संध्याकाळ चहा, नाष्ठा, दुध न दिल्यास. | कोणत्याही भंगासाठी एकावेळी रु.५०० /- प्रतिदिन |
| | २) रुग्णांचा बिछाणा तयार न केल्यास. चादर व उशांची कव्हर बदलली नसल्यास रुग्णांना वैद्यकीय चाचणीसाठी घेऊन जाण्यास व आणण्यास नकार दिल्यास व अंवलंबीत रुग्णांना प्रसाधन गृहात घेऊन जाण्यास नकार दिल्यास. | |
| | ३) महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवेशी सहाय्यकारी व इतर संबधीत कामे न केल्यास, रुग्णालयच्या इतर संबधित वास्तुंची स्वच्छता न ठेवल्यास तसेच महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करण्यास नकार दिल्यास. | |
| ३. | अ)विहित कालावधीत वेतनाचे अधिदान न केल्यास | प्रथम रु.५००/- तद्नतर प्रत्येक वेळी रु.१०००/- एवढे. |
| | ब)वेतनाचे अधिदान NEFT/ RTGS द्वारे न केल्यास संस्थेचे काम रद्द करून काळया यादीत नाव टाकले जाईल. | |
| ४. | अ) साधनसामुग्रीची कमतरता | जी साधनसामुग्री वापरली नसेल त्याचे किमतीचे (महापालिका दराने) दुप्पट रक्कम वसूल करून संबंधित वस्तु महापालिकेकडून पुरविण्यात येईल. |
| ५. | सुरक्षततेची साधने न वापरल्यास. | |
| अधिकतम मासिक दंडाची रक्कम ही मसिक अधिदानाच्या २० % एवढी राहील. व त्यापेक्षा अधिक दंड न आकारता ''कारणे दाखवा नोटीस'' बजावून पुढील उचित कारवाई करण्यात येईल. | | |

**वैद्यकीय अधिक्षक**
**क्षयरोग रुग्णालय समूह**

**हमीपत्राचा**

**परिशिष्ट 'क'**

**प्रति,**

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**
**सार्वजनिक आरोग्य खाते**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**

मी श्री/ श्रीम–..........................................................या संस्थेच्या पदाधिकारी म्हणून ........................................ या पदावर दिनांक ...................... पासून कार्यरत असून संस्थेच्या नियमानुसार/ ठरावानुसार मला संस्थेच्या वतीने सदर हमीपत्र देण्याचा अधिकार असून त्यानुसार मी खालीलप्रमाणे हमीपत्र देत आहे.

१. मुंबई महागरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडीयेथे आंतररुग्णांची रुगणसेवा, दैनंदिन रुग्णसहाय्य/रुग्णसेवा व इतर रुग्णालयीन कामाकरिता कंत्राटी तत्वावर ५० बहुउद्देशिय कामगारांचा पुरवठा करण्याचे काम आमच्या संस्थेला मिळण्यासाठी मी अर्ज केला असून अर्जात नमुद केलेला सर्व तपशील माझ्या माहीतीनुसार योग्य व खरा आहे.

२. मी शपथपुर्व जाहीर करतो/करते की, आमच्या संस्थेचा उद्देश हा संस्थेच्या सभासदांना रोजगार मिळवून देणे हा असून माझी संस्थां कार्यादेश मिळाल्यास योजनेच्या नियमानुसार काम करेल याची हमी या द्वारे देतो/देते.

३. आम्हाला मिळालेल्या कार्यादेश संपुर्ण अथवा विभागून अन्य संस्था किंवा कंत्राटदारास देणार नाही.

४. सदर कामात राज्य/ केंद्रशासनाने पारीत केलेल्या सर्व सभासद कायद्यांचे आम्ही संपुर्ण पालन करु.

५. अर्जात नमुद केलेल्या सर्वबाबी मी वाचल्या आहेत व त्या मला समजल्या आहेत. परिशिष्टातील अटी/शर्ती मला मान्य आहे. मी असे जाहीर करतो / करते की अर्जात दिलेली माहीती माझ्या विश्वासानुसार सत्य व योग्य असून ती असत्य दिसून आल्यास मी कारवाहीला पात्र असून संस्थेला दिलेले काम / कार्यादेश रद्द होवू शकतो हे मान्य आहे.

स्वाक्षरी:-

नाव:-

संस्थेचे नाव व शिक्का